RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ८५(४)] शुक्रवार, जून २४, २०२२/आषाढ ३, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २३६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ जून २०२२.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस ०४१७/प्र.क्र.५९(भाग-१)/राउशु-२.— ज्याअर्थी, मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क) नियम, १९५४ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) च्या परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धीशिवाय हे नियम करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम १४३ चे पोट-कलम (३) च्या परंतुकासह पोट-कलम (२) च्या खंड (यु) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क) नियम, १९५४ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क) (दुसरी सुधारणा) नियम, २०२२ असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई दारुबंदी ( विशेषाधिकार शुल्क ) नियम, १९५४ मधील नियम ५-अ ऐवजी खालील नियम समाविष्ट करण्यात येत आहे, जसे की :—

"**५अ. भाडे करार, पोट-भाडे करार, टाय-अप करार अथवा अन्य कोणताही तत्सम कराराद्वारे दिलेल्या अनुज्ञप्तीसाठी शुल्क.-** महाराष्ट्र देशी दारु नियम,१९७३ खालील नमुना "सीएल-१", महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती नियम,१९६६ खालील नमुना "बीआरएल", महाराष्ट्र आसवन व पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ खालील नमुना" पीएलएल" व नमुना "आय" अनुज्ञप्ती कुठल्याही कराराद्वारे वा व्यवस्थेद्वारे, अनुज्ञप्ती मंजुरी प्राधिका-याच्या पूर्वपरवानगीने भाडे करार, पोट-भाडे करार, टाय-अप करार अथवा अन्य कोणताही तत्सम कराराद्वारे चालविण्यास देण्यासाठी विशेषाधिकार शुल्क म्हणून दरवर्षी वार्षिक अनुज्ञप्ती शुल्काच्या १५ टक्के शुल्क आकारण्यात यावे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

**HOME DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 24th June 2022

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MIS 0417/C.R.59 (part-1)/EXC-2.— Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Prohibition (Privileges Fees) Rules, 1954, should be brought into force at once and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act, (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*u*) of sub-section (*2*) read with the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Prohibition (Privileges Fees) Rules, 1954, as follows, namely :—

1. These rules may be called the Bombay Prohibition (Privileges Fees) (Second Amendment) Rules, 2022.

2. For rule 5A of the Bombay Prohibition (Privileges Fee) Rules, 1954, the following rules shall be substituted namely :—

*“5A. Fee for lease, sub-lease, tie-up or any other similar agreement of licence*.- The fee payable by any licensee for privilege of having the lease, sub-lease, tie-up or any other similar agreement of his licence in Form “CL-1” under the Maharashtra Country Liquor Rules, 1973, in Form “BRL” under the Maharashtra Manufacture of Beer and Wine Rules, 1966 and in Form “PLL” or “I” under Maharashtra Distillation of Spirit and Manufacture of Potable Liquor Rules, 1966 under any agreement or arrangement to any person with the previous written permission of the authority granting the licence shall be 15 per cent of applicable licence fee, which shall be levied annually.”.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.